ठराव मंजूर करतांना हात वर करुन मताधिक्य आजमावले जाईल. मात्र जर सभासदांनी मतदानाची मागणी केली तर त्याप्रमाणे मतदान त्वरीत घेणेत येईल.

३८) **सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त :**

साधारण सभेचे इतिवृत्त सभा झाल्यापासून ३० दिवसांचे आत त्यासाठी ठेवलेल्या स्वतंत्र इतिवृत्त पुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे. सदर इतिवृत्तावर अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सह्या कराव्यात. अशा प्रकारचे सह्या केलेले इतिवृत्त सभेमध्ये झालेल्या कामकाजाचा अचूक पुरावा म्हणून समजले जाईल.

३९) **संचालक मंडळ :**

१) बँकेचे कार्यकारी व्यवस्थापन बँकेच्या ठेवीनुसार आवश्यक संख्येच्या संचालक मंडळाकडे राहील.

| | |
|---|---|
| सर्वसाधारण क्रियाशील सभासदातून | ७ |
| अनुसुचित जाती/जमाती | १ |
| महिला | २ |
| इतर मागास वर्गीय | १ |
| भटक्या विमुक्त जाती/जमाती | १ |
| तज्ञ संचालक | २ |
| कार्यकारी संचालक | १ |
| | १५ |

याप्रमाणे बँकेचे संचालक मंडळ एकूण १५ सदस्यांचे राहील.

२) **राखीव जागा – तज्ञ संचालकांसाठी –**

बँकेच्या संचालक मंडळामध्ये दोन तज्ञ संचालक क्रियाशिल सभासदांमधून स्वीकृत केले जातील. सदर संचालकांना बँकेच्या व्यवस्थापनाच्या मधल्या फळीत काम केल्याचा किमान १० वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे किंवा बँकींग संबधीची व्यावसायीक शैक्षणीक पात्रता असणे आवश्यक आहे. यासाठी व्यावसायीक शिक्षण म्हणजे सी.ए./आय.सी.डब्ल्यू.ए./सी.एस./वकील/निवृत्त बँक अधिकारी/बँकींग संबधी प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक की, ज्यांना प्रशिक्षण देण्याचा किमान १० वर्षाचा अनुभव आहे. (रिझर्व्ह बँकेचे परिपत्रक क्र. PCB.CIR.POT ३९/०९.१०३.०१ /२००१-०२, दि.०५/०४/२००२)

३) राखीव जागा – (कायदा कलम ७३ (ब))

अ) संचालक मंडळावरील एक जागा क्रियाशिल सभासदांमधील अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीसाठी राखीव असेल.

ब) संचालक मंडळावरील एक जागा क्रियाशिल सभासदांमधील इतर मागासवर्गीयांसाठी राखीव असेल.

क) संचालक मंडळावरील एक जागा क्रियाशिल सभासदांमधील भटक्या जाती, विमुक्त जाती, विशेष मागास जमाती यासाठी राखीव असेल.